अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ४५७८
दिनांक :-२६/१०/२०२०.

## आदेश

**विषय : कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**

पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांचे नेमणूकीबाबत.

**संदर्भ :**
१) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०.
३) जाहिरात क्र.१/१९४ दि.०९/०७/२०२०
४) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२६५९, दि.२२.०७.२०२०
५) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२७७३, दि.२७.०७.२०२०
६) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२८६३, दि.३०.०७.२०२०
७) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/३०४२, दि.०६.०८.२०२०
८) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/३३९१, दि.१८.०८.२०२०
९) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/३६६४, दि.२७.०८.२०२०
१०) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/४२४४, दि.१८.०९.२०२०
११) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२६, दि. १५.०९.२०२०.
१२) आदेश जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/४८३५ , दि. २५.१०.२०२०

Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" नियुक्त करणेस संदर्भ क्र. ३ अन्वये अर्ज मागविलेले होते. त्यामधून इतर अर्हता व इंग्रजी टंकलेखन चाचणी परीक्षेचे मंजूर गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांची निवड केलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्र.४ ते १० अन्वये "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांचे नियुक्ती आदेश प्रसृत करण्यात आले आहेत. सदर आदेशातील अटी व शर्ती मधील मुद्दा क्र. ४ अन्वये त्यांची आपत्कालीन परिस्थिती संपुष्टात येईपर्यंत अथवा आदेशांचे दिनांकापासून एक महिनापर्यंत कामकाजासाठी नियुक्ती केलेली आहे.

पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजासाठी "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांची आवश्यकता विचारात घेऊन संदर्भ क्र. ४ ते १० चे आदेशान्वये कामकाज करीत असलेल्या "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांची त्यांचे नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून प्रथम ४५ दिवसांकरिता संदर्भ क्र.१२ चे आदेशान्वये नेमणूक करण्यात आली असून ४५ दिवसांनंतर त्यांची सेवा खंडित केलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्र. ४ ते ९ चे आदेशान्वये कामकाज करीत असलेल्या "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांना ४५ दिवसांनंतर १ दिवस सेवाखंड देऊन सेवाखंडाच्या पुढील दिवसापासून त्यापुढे ४५ दिवसांकरिता कार्योत्तर मंजुरी देऊन नेमणूक करण्यात येत आहे.

तसेच संदर्भ क्र.१० चे आदेशान्वये कामकाज करीत असलेल्या "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांना ४५ दिवसांनंतर १ दिवस सेवाखंड देऊन सेवाखंडाच्या पुढील दिवसापासून त्यापुढे ४५ दिवसांकरिता नेमणूक करण्यात येत आहे.